जा.क्र. पोमसं / २१ / ७२७२ / सोसायटी सुरक्षा / ५६ / २०१६, दि.९ / ०२ / २०१६.

**विषय :-** को-ऑप. हौसिंग सोसायटी, खाजगी कार्यालये व धार्मिक ठिकाणे यांच्या सुरक्षेबाबत काय करावे व काय करु नये (Do's & Don'ts).

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, १) को-ऑप .हौ.सोसायटी, २) खाजगी कार्यालये व ३) धार्मिक ठिकाणे यांची सुरक्षा हा नेहमीच प्राधान्याचा विषय आहे. बऱ्याच वेळा गुन्हा झाल्यानंतर आपण सुरक्षाविषयक उपाययोजना करण्याकरीता संबंधीतांना कळवितो. वास्तविक यातील काही सूचना ह्या इमारत बांधतेवेळीच त्यासंबंधी काळजी घेणे आवश्यक असते.

२. सर्व घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी १) को-ऑप .हौ.सोसायटी, २) खाजगी कार्यालये व ३) धार्मिक ठिकाणे यांच्या सुरक्षेकरीता काय करावे व काय करु नये याबाबत खालील सूचना अंमलात आणाव्यात. अशीच व्यवस्था ज्यांच्या घरात मोठया प्रमाणात दागिने, रोख रक्कम असेल, त्यांनी व जोखमीच्या वस्तु विकणा-या दुकानात करण्यासाठी कळवावे.

**अ) को-ऑप. हौसिंग सोसायटी अस्तित्वात असलेल्या आस्थापना / इमारत**

**१) को-ऑप. हौसिंग सोसायटी अस्तित्वात असलेल्या आस्थापना / इमारतीबाबत करावयाच्या उपाययोजना**

१. अस्तित्वात असलेल्या हौसिंग सोसायटीचे कंपाऊंड मजबुत व त्यावर काटेरी तारेच्या जाळ्या बसवुन घ्याव्यात.
२. हौसिंग सोसायटीमध्ये येण्या - जाण्यासाठी एकापेक्षा जास्त प्रवेशद्वार असल्यास इतर प्रवेशद्वार बंद करुन शक्यतो एकच प्रवेशद्वार ठेवावे.
३. बिल्डींगमधील सर्व फ्लॅटच्या दर्शनि दरवाज्यास तसेच सर्व प्रवेशद्वारास लोखंडी ग्रील बसवावे व त्यास चांगल्या दर्जाचे कुलूप बसवावे.
४. इमारतीच्या सर्व बाजूस चांगली प्रकाश व्यवस्था करण्यात यावी.
५. मुख्य प्रवेशाच्या ठिकाणी तसेच इमारतीच्या चारही बाजुंनी सर्व अँगल्स सीसीटीव्हीद्वारे कव्हर होतील अशा प्रकारे सीसीटीव्ही पुरेशा प्रमाणात लावावेत.
६. को.ऑप हौसिंग सोसायटीच्या क्षेत्रानुसार पुरेशा प्रमाणात तरुण व सुदृढ सुरक्षा रक्षक ठेवण्यात यावेत. त्याप्रमाणे सोसायटीमध्ये येणाऱ्या व्यक्तींबाबत माहितीची नोंद घेण्यासाठी नोंदवही ठेऊन त्यामध्ये त्या व्यक्तीचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर, कोणाकडे जाणार आहे, इ. बाबत नोंद करावी.
७. सोसायटीमध्ये ठेवण्यात येणारे सुरक्षा रक्षकांचे चारित्र्य पडताळणी करुन घ्यावी. तसचे त्याचेकडून त्याचे फोटो व वैयक्तीक माहिती घेऊन तशी नोंद सोसायटीच्या कार्यालयात करुन ठेवावी.
८. रात्रगस्तीच्यावेळी सुरक्षा रक्षक आपले कर्तव्य व्यवस्थित बजावत आहेत किंवा नाही याबाबत सोसायटीच्या कार्यालयास कळवावे व त्याच्या नोंदवहीत भेट दिल्याची नोंद करावी.
९. सोसायटी / सुरक्षा रक्षकाकडे जवळील पोलीस ठाण्याचा दूरध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे.
१०. को.ऑप हौसिंग सोसायटीमध्ये पोलीस ठाणेस / चौकीस तात्काळ संपर्क होईल अशी अलार्म सिस्टीम ठेवण्यात यावी.
११. सोसायटी मध्ये नेहमी येणारे वर्तमानपत्र विक्रेते, सफाई कामगार, ड्रायव्हर, लॉन्ड्रीवाले, भाजी विक्रेते यांची वेगळी नोंद वही ठेवण्यात यावी.
१२. बाहेरगावी जाताना स्थानिक पोलीस ठाणेस तसेच शेजाऱ्यास कळवावे. तसेच घरातील मौल्यवान वस्तु, पैसे व दागिने हे बँकेच्या लॉकरमध्ये ठेवावे. तसेच मौल्यवान वस्तुंचा विमा करावा.
१३. सोसायटीमध्ये इमर्जन्सी लाईट व्यवस्था असावी.